# YASHODA GIRLS'
# ARTS & COMMERCE COLLEGE
## SNEH NAGAR, NAGPUR

# DEPARTMENT OF SOCIOLOGY

# SESSION- 2024-2025

**GUEST LECTURE & P0STER EXIBITION ON TRIBES LIFE**

**GUEST –SHRI LAXMAN SINH MARAKAM**
**(INS AIR SQUADRON & ADD.SECRETARY OF C.M. MADHYA PRADESH)**

**SPEECH ON- CAREER & PERSONALITY DEVELOPMENT OF TRIBES**

**GUEST LECTURE & P0STER EXIBITION ON TRIBES LIFE**

**GUEST –SHRI LAXMAN SINH MARAKAM**
**(INS AIR SQUADRON & ADD.SECRETARY OF C.M. MADHYA PRADESH)**

**SPEECH ON- CAREER & PERSONALITY DEVELOPMENT OF TRIBES**















# यशोदा गर्ल्समध्ये 'करिअर, व्यक्तिमत्त्व'वर व्याख्यान

**मेट्रो सिटी नागपूर न्यूज**

नागपूर : यशोदा गर्ल्स आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज, स्नेह नगर येथे समाजशास्त्र विभागातर्फे विद्यार्थिनींकरिता 'करिअर मार्गदर्शन, व्यक्तिमत्व विकास आणि आदिवासी विद्यार्थिनींची सामाजिक जाणीव' या विषयावर विशेष अतिथी व्याख्यानाचे तसेच भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात आदिवासी क्रांतिकारकांनी दिलेल्या योगदानावर कृती चित्र प्रदर्शनाचे सुद्धा आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी या चित्र प्रदर्शनाचे उद्घाटक आणि विशेष वक्ते म्हणून भारतीय नौसेना एअर स्क्वाड्रन तथा मा. मुख्यमंत्री (मध्य प्रदेश) यांचे अतिरिक्त सचिव श्री. लक्ष्मण सिंह मरकाम हे होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद सांबारे यांनी कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान भूषविले.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन आणि विद्यापीठ गीताने झाली. याप्रसंगी विद्यार्थिनींनी आदिवासी नृत्य सादर केले. प्रमुख वक्ते श्री. लक्ष्मण सिंह मरकाम यांनी आपल्या व्याख्यानात विद्यार्थिनींना स्पर्धात्मक परीक्षेची तयारी कशी करावी, कोणकोणत्या आव्हानाला कसे सामोरे जावे याबद्दल माहिती दिली. जीवनात यश मिळवायचे असेल तर आत्मविश्वास, सकारात्मक विचार, तंत्रज्ञान, नकारात्मक बाबींपासून दूर राहणे, स्वतःचा गुरु स्वतः असणे, कष्ट करण्याची तयारी ह्या बाबी खूप महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी आपल्या व्याख्यानात सांगितले. तसेच त्यांनी भारतीय स्वातंत्र्य लढ्यात आदिवासी क्रांतिकारकांनी देशासाठी बलिदान देऊन महत्वपूर्ण योगदान दिले असे मत व्यक्त करून चित्र प्रदर्शनाच्या माध्यमातून या अनेक क्रांतिकारच्या कृतीचे सुंदर रेखाटन करून महाविद्यालयातर्फे आयोजन केलेल्या चित्र प्रदर्शनाबद्दल कार्यक्रमाचे उद्घाटक. श्री. लक्ष्मण सिंह मरकाम यांनी समाधान व्यक्त केले तसेच आदिवासी विद्यार्थ्यांसाठी असलेल्या सरकारी योजनांची सुद्धा त्यांनी माहिती दिली.

प्राचार्य डॉ. शरद सांबरे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात महाविद्यलयीन विद्यार्थ्यांना आदिवासी क्रांतीकाराचे योगदान, देशसेवेची माहिती व प्रेरणा मिळावी या उदात्त हेतू या प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन, प्रास्ताविक व संचालन समाजशास्त्र विभागाच्या प्राध्यापिका डॉ. संगीता घोगरे यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. ललिता पुत्रया यांनी केले. याप्रसंगी महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षेतर कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थिनी उपस्थित होत्या.




